# PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION
# JAGADGURU SANT TUKARAM MAHARAJ SANTPITH SCHOOL & JR. COLLEGE

Patilnagar, Talgaon Chikhali, Pune - 411062

Affiliation No: 1120131 School Code: 32147 UDISE CODE: 27252000538

Contact No: 9022816058 E-mail : santpithschool@gmail.com


जा.क्र.संतपीठ/स्कूल/०१/कावि/236/२०२५-२६ दिनांक - 10/०३/२०२६

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठमधील पदाधिकारी, चिंतन समिती सदस्य, मुक्त संगीत विभागातील शिक्षक कर्मचारी व शाळेतील शिक्षक कर्मचारी यांस श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ - संत नामदेव महाराज जन्मस्थळ नरसी नामदेव - संत जनाबाई जन्मस्थळ गंगाखेड या तीर्थक्षेत्र ठिकाणी घेवून जाणेकरीता खुल्या बाजारातून अंदाजित दर मागविणेबाबत....

प्रति,
मा.----------------------
------------------------
------------------------

## कोटेशन नोटीस क्र. 23/२०२५ - २०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठमधील पदाधिकारी, चिंतन समिती सदस्य, मुक्त संगीत विभागातील शिक्षक कर्मचारी व शाळेतील शिक्षक कर्मचारी यांस श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ - संत नामदेव महाराज जन्मस्थळ नरसी नामदेव - संत जनाबाई जन्मस्थळ गंगाखेड येथील तीर्थक्षेत्रांना भेटी देणेकामी घेवून जाणेकरीता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकामी खुल्या बाजारातून अंदाजित सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे....

दिनांक - १५ मार्च २०२६ ते १७ मार्च २०२६ रोजीचा प्रवास तक्ता

| दिनांक | तपशील | शेरा |
|---|---|---|
| रविवार, १५ मार्च २०२६ | जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेजमधील पदाधिकारी, चिंतन समिती सदस्य व शिक्षक कर्मचारी असे एकूण ३२ व्यक्तींना जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर चिखली येथून श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग औंढा नागनाथकडे घेवून जाणेकरीता ३२ सीटर एस.सी गाडीची सायंकाळी ०५:३० वा. व्यवस्था करणे. | |
| सोमवार, १६ मार्च २०२६ | बस प्रवास मार्गाने अंदाजे रात्री ०२:३० वाजण्याच्या दरम्यान श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ येथील नियोजित ठिकाणी निवासी व्यवस्था करणे.<br>श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ येथे सकाळी ०८:०० वाजता नियोजित ठिकाणी नाश्ताची व्यवस्था करणे.<br>श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ येथील देवस्थानांना भेटी देणे.<br>श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ येथे दुपारी ०१:०० वाजता दुपारचे भोजनाची व्यवस्था करणे.<br>अंदाजे दुपारी ०२: ०० वाजता संत नामदेव महाराज जन्मस्थळ नरसी नामदेव कडे प्रस्थान करून दुपारी ०४:०० वाजता नियोजित ठिकाणी पोहोचणे.<br>रात्री ०८:०० वाजता संत नामदेव महाराज जन्मस्थळ नरसी नामदेव येथील नियोजित ठिकाणी रात्रीचे भोजन व निवासी व्यवस्था करणे. | |
| मंगळवार, १७ मार्च २०२६ | श्री क्षेत्र नरसी नामदेव येथे सकाळी ०८:०० वाजता नियोजित ठिकाणी नाश्ताची व्यवस्था संत जनाबाई जन्मस्थळ गंगाखेड कडे प्रस्थान करणे.<br>अंदाजित बस प्रवास मार्गाने सकाळी ११:५० वाजता गंगाखेड मध्ये पोहोचणे. गंगाखेड या ठिकाणी दुपारी ०१:०० वाजता जेवणाची व्यवस्था करणे.<br>परतीच्या प्रवास दरम्यान परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग, अंबाजोगाई, होळ - लाडेवडगाव व पावनधाम या ठिकाणी भेट देणे.<br>बस प्रवास दरम्यान नियोजित ठिकाणी रात्रीच्या जेवणाची सोय करणे.<br>रात्री १२:०० वाजता जगदगुरु संत तुकाराम महाराज जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर येथे पोहोचणे. | |

**कोटेशन नोटीस व नियम अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. इच्छुक ठेकेदारांनी / पुरवठाधाराकांनी उपरोक्त नमूद केलेल्या कामाचे दर दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार व आवश्यक त्या कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात मा.प्राचार्य, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज यांचे नावे दिनांक - ११/०३/२०२६ ते दि - १३/०३/२०२६ अखेर दुपारी ३:०० वाजेपर्यंत जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज हे पाटीलनगर, टाळगाव चिखली, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे ४११०६२ येथे सादर करावे.

२. पुरवठा धारकाने कोटेशन सोबत शॉप ॲक्ट नोंदणी दाखला, उद्योम आधार, पॅनकार्ड इ. कागदपत्रांच्या प्रती सादर करण्यात याव्यात.

३. पुरवठा धारकाने प्रवासाचे दर सर्व करासह व वाहतूक खर्चासह पोहोच देण्यात यावे.

४. तपशिलावर प्रतिदिन प्रति व्यक्ती एकूण अंदाजित खर्च प्रदान करावा.

५. प्रवास, अनलिमिटेड व्हेज भोजनताट, नाश्ता, चहापान तिकीट इ. साठी स्पष्ट श्रेणीसह प्रति व्यक्ती अंदाजे खर्च प्रदान करावा.

६. कृपया एक कार्यकारी / समन्वयक प्रदान करावा जो प्रवास इत्यादीसाठी जबाबदार असेल.

७. मागणी केलेल्या विविध श्रेणींची किंमत परवडणारी असावी आणि बाजाराच्या दरांशी जुळणारी पाहिजे.

८. वरीलपैकी काही ठिकाणे बदलू शकतात आणि ते बदल कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय उपलब्ध करून देणेत यावे.

९. सिलबंद कोटेशन पाकिटावर नोटीस क्रमांक फर्म /कंपनीचे नावाचा स्पष्ट उल्लेख करावा.

१०. उशिरा आलेल्या व अपुऱ्या तसेच अटीयुक्त कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

११. कोटेशन संपूर्ण प्रक्रियेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ) हे लवाद म्हणुन जो निर्णय देतील तो अंतिम राहील. जो उभयंतावर बंधनकारक राहील.

१२. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांनी राखून ठेवला आहे.

१३. सदरची कोटेशन नोटीस संतपीठाचे www.santpithpcmc.com या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

**संदीप खोत**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ